**<u>ठळक बातम्या</u>**

- धर्मेंद्र प्रधान यांच्याकडून केंद्रीय शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा

- सरकारनं सर्व मागण्या मंजूर करण्याचं आश्वासन दिल्यानंतर कॉकरोच जनता पार्टीकडून आंदोलन मागे

- आषाढी एकादशीनिमित्त राज्यभरात भक्तीभावाचं वातावरण, पंढरपूर कॉरिडॉर करताना कोणावरही अन्याय होऊ देणार नसल्याचं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण

- टीईटी पेपरफुटी प्रकरणातल्या दोन मुख्य सूत्रधारांना बिहारमधून अटक

आणि

- पालघरमध्ये गेल्या काही दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळं २० जणांचा मृत्यू, सरकारकडून मदत देण्याच्या प्रक्रियेला गती

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज दुपारी पदाचा राजीनामा दिला. हा राजीनामा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठवल्याचं त्यांनी समाज माध्यमांवरच्या संदेशात जाहीर केलं.

गेल्या १० दिवसात देशात सुरू असलेल्या घडामोडी दुःखद आहेत. कायदेशीर अडचणींमध्ये न फसता विद्यार्थ्यांनी शिक्षणावर, करियरवर लक्ष केंद्रित करावं यासाठी हा राजीनामा दिल्याचं त्यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे. युवक हीच देशाची खरी ताकद आहे आणि संभ्रमात आणणाऱ्या कुठल्याही दुष्टचक्रात त्यांना अडकू देणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

नीट परीक्षेच्या संदर्भातली सगळी जबाबदारी मी पहिल्या दिवसापासून घेतली. पेपर फोडणाऱ्यांमुळं कुठल्याही प्रज्ञावान विद्यार्थ्याची मेहनत वाया जाऊ नये यासाठी अथक प्रयत्न केल्याचं ते म्हणाले. १६ जुलै रोजी जाहीर झालेल्या नीट परीक्षेच्या निकालात अनेक गरीब आणि प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना चांगलं यश मिळालं. मात्र तरीही महत्त्वाच्या पदावरच्या काही व्यक्तींनी यात अडथळे आणण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केलं.

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा म्हणजे देशातल्या युवा शक्तीच्या एकजुटीचा आणि लोकशाहीचा मोठा विजय असून देशाच्या लोकशाहीनं कात टाकल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. एक तर राजीनामा घ्या किंवा केंद्रीय मंत्रिमंडळातील एक दोन ज्येष्ठ मंत्र्यांना आंदोलकांशी चर्चा करायला सांगा, अशी चर्चा प्रधानमंत्र्यांसोबतच्या भेटीत झाली होती असंही ते म्हणाले. सरकारनं लाठीचार्ज, अश्रूधूर टाळायला हवं होतं, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

उद्याचा तिरंगा मार्च ठरल्याप्रमाणे होणारच असं माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज सांगितलं. काॅकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपकेंना आपला पूर्ण पाठिंबा असल्याचं दोघांनी स्पष्ट केलं. आंदोलनकर्त्यांना मारहाण करणाऱ्या दिल्ली पोलिसांवर कारवाई होणार का असा सवालही त्यांनी केला.

**<><><><><>**

सरकारनं सर्व मागण्या मान्य करण्याचं आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेत असल्याची घोषणा कॉकरोज जनता पार्टीनं आज नवी दिल्लीत केली.

केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा तसंच जितेंद्र सिंग यांनी आज सीजेपीच्या सौरव दास आणि आशुतोष रांका यांच्यासोबत चर्चा केली. त्यानंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत आंदोलन मागे घेत असल्याची घोषणा कॉकरोज जनता पार्टीनं केली.

- **- होल्ड - सीजेपी - -**

आंदोलनकर्त्यांच्या विरोधात असलेले FIR मागे घेणं तसंच नीट परीक्षा रद्द झाल्यानंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना विद्यमान नियमानुसार आर्थिक मदत देण्याची तयारीही सरकारनं दाखवली आहे.

- **- होल्ड- नड्डा - - -**

आंदोलनकर्त्यांनी शिक्षण क्षेत्रातल्या सुधारणांविषयीच्या मागण्यांचं निवेदनसुद्धा सरकारला सादर केलं आहे. त्यावर झालेल्या प्रगतीची माहिती ४ आठवड्यात देऊ, असं आश्वासन सरकारनं दिलं आहे.

गेल्या २० जून पासून कॉकरोज जनता पार्टीनं नवी दिल्लीत जंतर मंतरवर आंदोलन सुरू केलं होतं.

**<><><><><>**

गेल्या चार वर्षांपासून राज्यात MHT-CET परीक्षांमध्ये होत असलेल्या घोटाळ्यांची, निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र चौकशी समिती नेमून चौकशी झाली पाहिजे अशी मागणी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव आणि तेलंगणा प्रभारी सचिन सावंत यांनी मुंबईत झालेल्या वार्ताहर परिषदेत केली. दहावी आणि बारावीत ४०-५० टक्के मार्क मिळालेल्या विद्यार्थ्यांना एमएचटी-सीईटी परिक्षेत मात्र ९० पेक्षा जास्त पर्सेंटाईल पडले आहेत. २०२६ च्या निकालात जुळ्या भावड्यांना एकसारखे मार्क पडले आहेत, असंही सावंत म्हणाले.

**<><><><><>**

देवशयनी आषाढी एकादशी निमित्तानं पंढरपुरात आज पहाटे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. यंदाचे मानाचे वारकरी धाराशिव जिल्ह्यातील बाबासाहेब माने आणि प्रभावती माने यांनीही मुख्यमंत्र्यांसोबत विठूरायाची पूजा केली. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीनं त्यांचा सत्कार करण्यात आला. ऐकुया याविषयीचा वृत्तांत

- **- - कॅप्सूल- - -**

*(महापूजेनंतर मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या सुख-समृद्धीसाठी, शेतकऱ्यांच्या भरभराटीसाठी आणि प्रत्येक नागरिकाच्या मंगलमय जीवनासाठी विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना केली. विठुरायाच्या दर्शनासाठी दरवर्षी वाढणारी भक्तांची गर्दी पाहता त्यांना उत्तम सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर परिसर विकासाचं काम ‘पंढरपूर कॉरिडॉर’च्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या कॉरिडोरचं काम करताना कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही, सर्वांचं योग्य पुनर्वसन केलं जाईल, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.*

- ***- होल्ड - बाईट मुख्यमंत्री- - -***

*पंढरपूर इथल्या श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या भक्तिनिवासाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आलं. दरम्यान, विठ्ठलाच्या दर्शनासाठी छत्रपती संभाजीनगर इथून पंढरपूरला आलेल्या भाविकाला छातीत त्रास जाणवू लागल्याने त्यांच्यावर तातडीने उपचार करून एअर ॲम्ब्युलन्सने सोलापूरला हलवण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी*

*विमानतळावर एअर ॲम्ब्युलन्समध्ये रुग्णाची भेट घेऊन आवश्यक उपचार करण्याचे निर्देश वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले.)*

**<><><><><>**

आषाढी एकादशीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. भक्ती, करुणा आणि सेवाभावाचा शाश्वत संदेश देणारा हा पवित्र दिवस प्रत्येकाच्या जीवनात आनंद, सौहार्द आणि समृद्धी घेऊन येवो, अशी त्यांनी विठ्ठल चरणी प्रार्थना केली. प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणासाठी आणि सन्मानासाठी अखंड सेवाभावाने कार्य करण्याचा संकल्प अधिक दृढ होवो, अशी प्रार्थनाही मोदी यांनी केली.

आषाढी एकादशीनिमित्त आज सकाळपासून राज्यभरातल्या विठ्ठल मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

**<><><><><>**

टीईटी अर्थात महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणातले मुख्य आरोपी विजेंद्र कुमार गुप्ता आणि इंद्रजीत सिन्हा यांना भिवंडी न्यायालयानं ३० जुलैपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.  या दोघांना आज बिहार समस्तीपूर इथून अटक करण्यात आली. या प्रकरणातील एकूण अटक आरोपींची संख्या आता १४ वर पोहोचली आहे. आग्रा येथील ‘महीम पत्रण’ छापखान्यातील कर्मचाऱ्यांकडून त्यांनी पेपर विकत घेतल्याची माहिती मिळाली असून याबाबत अधिक तपास सुरु असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात पुरामुळे बाधित झालेल्या पूरग्रस्तांना शासनाची आर्थिक मदत देण्याच्या प्रक्रियेला गती दिली आहे. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात २० जणांचा मृत्यू झाला असून मृतांच्या वारसांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. ४४ पूर्णपणे पडझड झालेली, ४२१ अंशतः पडझड झालेली,  १२६ कच्ची घरं, १० झोपड्या आणि ३ गोठ्यांचं नुकसान झालं आहे. यात पशुधनाचंही मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. या सर्व पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या नियमानुसार आर्थिक मदत दिली जाणार आहे. पुरामुळे घरात पाणी शिरलेल्या १९ हजार २६ घरांचे पंचनामे पूर्ण झाले असून त्या लाभार्थ्यांनाही आर्थिक सहाय्य देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी आज या गावांना  भेट देत परिस्थितीची पाहणी केली. महसूल, आपत्ती व्यवस्थापन, कृषी, पशुसंवर्धन, सार्वजनिक बांधकाम, महावितरण आणि इतर विभागांनी समन्वय साधत याठिकाणी युद्धपातळीवर पंचनामे पूर्ण केले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमाद्वारे देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३६ वा भाग आहे. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, News on air वेबसाइट, न्यूज ऑन एआयआर मोबाइल ॲपवर होईल. याशिवाय एआयआर न्यूज, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसेच केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यू ट्यूब वाहिन्यांवर कार्यक्रमाचे लाइव्ह प्रक्षेपण करण्यात येईल.

<><><><><>

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात सुरु असलेल्या तीन टी ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात आज भारतानं झिम्बाब्वेसमोर विजयासाठी २० षटकांत २२० धावांचं आव्हान ठेवलं आहे. झिम्बाब्वेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं २० षटकांत ५ बाद २१९ धावा केल्या. भारतातर्फे ईशान किशननं ८१ तर तिलक वर्मानं नाबाद ६० धावा केल्या.

सामन्याचं शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा  झिम्बाब्वेनं ७ षटकांत ४ बाद ५९ धावा केल्या होत्या.

//<><><><><>//